महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.

# तंत्रज्ञ-३ पदाची सरळसेवा भरती
## जाहिरात क्र.०४/२०२४

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील तंत्रज्ञ-३ या पदाकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

१) महानिर्मिती कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व विद्युत केंद्रातील रिक्त पद संख्या आणि सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन ८०० पदे भरावयाची आहेत.

**तंत्रज्ञ-३ रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

| श्रेणी | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | सा.आणि शै.मा.वर्ग (एसईबीसी) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य (महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तांव्यतिरिक्त इतर उमेदवार) | | | | | | | | | | | | |
| सामान्य | ५२ | २८ | १२ | १० | १४ | ८ | ८ | ७६ | ४० | ४० | ११२ | ४०० |
| महानिर्मिती कंपनीचे किमान ०५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार | | | | | | | | | | | | |
| प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी | २१ | ११ | ५ | ४ | ६ | ३ | ३ | ३० | १६ | १६ | ४५ | १६० |
| महानिर्मिती कंपनीचे ०१ वर्षे ते ०४ वर्षे कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार | | | | | | | | | | | | |
| प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी | २१ | ११ | ५ | ४ | ६ | ३ | ३ | ३० | १६ | १६ | ४५ | १६० |
| महानिर्मिती कंपनीच्या बी.टी.आर.आय.अंतर्गत अभ्यासक्रम पूर्ण केलेले प्रगत कुशल प्रकल्पग्रस्त उमेदवार | | | | | | | | | | | | |
| बी.टी.आर.आय. साठीचे आरक्षण | १० | ६ | २ | २ | २ | २ | २ | १६ | ८ | ०८ | २२ | ८० |
| **एकूण** | १०४ | ५६ | २४ | २० | २८ | १६ | १६ | १५२ | ८० | ८० | २२४ | **८००** |

तसेच तंत्रज्ञ-३ हे पद वेतनगट-३ मध्ये मोडत असल्याने शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदे खालीलप्रमाणे :-

| श्रेणी | पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज.-(ब) | भज-(क) | भज-(ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | सा.आणि शै.मा.वर्ग (एसईबीसी) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सामान्य (महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तां व्यतिरिक्त इतर उमेदवार) (एकूण रिक्त पदांच्या ५०%)** | तंत्रज्ञ-३ (वेतनगट-३) | **५२** | **२८** | **१२** | **१०** | **१४** | **८** | **८** | **७६** | **४०** | **४०** | **११२** | **४००** |
| | महिला (३०%) | १६ | ८ | ४ | ३ | ४ | २ | २ | २३ | १२ | १२ | ३४ | **१२०** |
| | माजी सैनिक (१५%) | ८ | ४ | २ | २ | २ | १ | १ | ११ | ६ | ६ | १७ | **६०** |
| | महानिर्मितीतील शिकाऊ उमेदवार (१०%) | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | ४ | ११ | **४०** |
| | प्रकल्पग्रस्त (५%) | ३ | १ | १ | १ | १ | ० | ० | ४ | २ | २ | ६ | **२१** |
| | खेळाडू (५%) | ३ | १ | १ | १ | १ | ० | ० | ४ | २ | २ | ६ | **२१** |
| | भूकंपग्रस्त (२%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | **८** |
| | सर्वसाधारण (३३%) | १६ | १० | ३ | २ | ५ | ४ | ४ | २४ | १३ | १३ | ३६ | **१३०** |
| | **एकूण** | **५२** | **२८** | **१२** | **१०** | **१४** | **८** | **८** | **७६** | **४०** | **४०** | **११२** | **४००** |

| श्रेणी | पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज.-(ब) | भज-(क) | भज-(ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | सा.आणि शै.मा.वर्ग (एसईबीसी) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी (महानिर्मिती कंपनीचे किमान ०५ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले पात्र प्रकल्पग्रस्त) (एकूण रिक्त पदांच्या २०%)** | तंत्रज्ञ-३ वेतनगट-३ | **२१** | **११** | **५** | **४** | **६** | **३** | **३** | **३०** | **१६** | **१६** | **४५** | **१६०** |
| | महिला (३०%) | ६ | ३ | २ | १ | २ | १ | १ | ९ | ५ | ५ | १३ | **४८** |
| | माजी सैनिक (१५%) | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | ५ | २ | २ | ७ | **२४** |
| | महानिर्मितीतील शिकाऊ उमेदवार (१०%) | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ | २ | २ | ४ | **१६** |
| | प्रकल्पग्रस्त (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | **८** |
| | खेळाडू (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | **८** |
| | भूकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | **२** |
| | सर्वसाधारण (३३%) | ८ | ३ | १ | २ | २ | २ | २ | ८ | ५ | ५ | १६ | **५४** |
| | **एकूण** | **२१** | **११** | **५** | **४** | **६** | **३** | **३** | **३०** | **१६** | **१६** | **४५** | **१६०** |

| श्रेणी | पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज- (ब) | भज- (क) | भज- (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | सा.आणि शै.मा.वर्ग (एसईबीसी) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी (महानिर्मिती कंपनीचे ०१ वर्ष ते ०४ वर्ष कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले पात्र प्रकल्पग्रस्त) (एकूण रिक्त पदांच्या २०%) | तंत्रज्ञ-३ (वेतनगट-३) | २१ | ११ | ५ | ४ | ६ | ३ | ३ | ३० | १६ | १६ | ४५ | १६० |
| | महिला (३०%) | ६ | ३ | २ | १ | २ | १ | १ | ९ | ५ | ५ | १३ | ४८ |
| | माजी सैनिक (१५%) | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | ५ | २ | २ | ७ | २४ |
| | महानिर्मितीतील शिकाऊ उमेदवार (१०%) | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ | २ | २ | ४ | १६ |
| | प्रकल्पग्रस्त (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| | खेळाडू (५%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| | भूकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| | सर्वसाधारण (३३%) | ८ | ३ | १ | २ | २ | २ | २ | ८ | ५ | ५ | १६ | ५४ |
| | एकूण | २१ | ११ | ५ | ४ | ६ | ३ | ३ | ३० | १६ | १६ | ४५ | १६० |

| श्रेणी | पदाचे नाव व वेतनगट | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज- (ब) | भज- (क) | भज- (ड) | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | सा.आणि शै.मा.वर्ग (एसईबीसी) | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बी.टी.आर.आय साठीचे आरक्षण (एकूण रिक्त पदांच्या १०%) | तंत्रज्ञ-३ (वेतनगट-३) | १० | ६ | २ | २ | २ | २ | २ | १६ | ८ | ८ | २२ | ८० |
| | महिला (३०%) | ३ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | २ | २ | ७ | २६ |
| | माजी सैनिक (१५%) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ४ | ११ |
| | महानिर्मितीतील शिकाऊ उमेदवार (१०%) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| | प्रकल्पग्रस्त (५%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| | खेळाडू (५%) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| | भूकंपग्रस्त (२%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | सर्वसाधारण (३३%) | २ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ४ | ४ | ४ | २६ |
| | एकूण | १० | ६ | २ | २ | २ | २ | २ | १६ | ८ | ८ | २२ | ८० |

* **दिव्यांग उमेदवारांकरीता ४% प्रमाणे ३२ पदे राखीव ठेवण्यात आलेली असून सदर ३२ पदांपैकी १६ पदे सामान्य श्रेणीच्या (महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तांव्यतिरिक्त इतर उमेदवार) दिव्यांग उमेदवारांमधून तर १६ पदे प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी / बी.टी.आर.आय. दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतील. वरील दिव्यांगप्रवर्गाकरीता खालील प्रकारातील दिव्यांग उमेदवार अर्ज सादर करु शकतात :-**

**b) HH**

**c) OA, LC,Dw,AAV**

**(HH = Hard of Hearing, OA=One Arm, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims)**

• वरील नमूद दिव्यांगत्वाच्या प्रकारातील एकाच व्यक्तीला एकापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेले उमेदवारसुध्दा अर्ज करु शकतात.

१) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३ दि.२३.०८.२०२१ व शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ नुसार अनाथ उमेदवारांना, दिव्यांग व्यक्तीकरीता लागू असलेल्या आरक्षणाच्या तरतूदीनुसार, १% पदे राखीव ठेवण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार एकूण ८०० पदांपैकी ०८ पदे अनाथ उमेदवारांकरीता राखीव ठेवण्यात येत आहेत. सदरील ०८ पदांपैकी ०४ पदे सामान्य प्रवर्गातील उमेदवारांकरीता तर ०४ पदे प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता राखीव ठेवण्यात येतील.वरील नमूद अनाथ व्यक्तींसाठी राखीव पदांपैकी पहिल्या पदासाठी "संस्थात्मक" प्रवर्गातील अनाथ उमेदवारांमधून भरण्यात येतील व दुसरे पद "संस्थाबाहय" प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येईल व अशा रितीने आळीपाळीने सदरील पदे भरण्यात येतील. तसेच वरील पदांकरीता "संस्थात्मक" / "संस्थाबाहय" प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास त्याअनुषंगाने अर्ज केलेल्या उपलब्ध अनाथ अर्जदारांकडून वरील पदे भरण्यात येतील.

२) उपरोक्त पदासाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / वयोमर्यादा इत्यादीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) **वेतनश्रेणी :** रु. ३४५५५-८४५-३८७८०-११४०-५०१८०-१२६५-८६८६५

२) **शैक्षणिक अर्हता :**

अ) संबंधित व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) नियमित (रेग्युलर) कोर्स उत्तीर्ण / राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांनी संबंधित व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र (NCTVT)/(MSCVT). सदर पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहित करण्यात आले आहेत. १) इलेक्ट्रीशियन (वीजतंत्री) २) वायरमन (तारतंत्री) ३) मशिनिस्ट (यंत्र कारागीर) ४) फिटर (जोडारी) ५) इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक / इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अॅन्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेंटेनन्स ६) इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टीम ७) वेल्डर (संधाता) ८) इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक ९) ऑपरेटर कम मेकॅनिक पोल्युशन कंट्रोल इक्वीपमेंट १०) बॉयलर अटेंडन्स ११) स्विच बोर्ड अटेंडन्स १२) स्टिम टर्बाईन ऑक्झीलरी प्लॅन्ट ऑपरेटर / स्टिम टर्बाइन ऑपरेटर १३) ऑपरेटर कम मेकॅनिक मटेरिअल हॅंडलींग इक्वीपमेंट १४) ऑपरेटर कम मेकॅनिक (पॉवर प्लॅन्ट) या शासनमान्य आय.टी.आय. / NCTVT /MSCVT उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.

ब) तसेच महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.३४२ दि.१५.०३.२०१६ अन्वये Center Of Excellance या योजनेतर्गत वरील नमूद १३ व्यवसायांशी समकक्ष असलेले खालील ०४ अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवारही अर्ज करु शकतात :-
अ) इलेक्ट्रीकल, ब) इलेक्ट्रॉनिक्स,क) प्रोडक्शन ॲण्ड मॅन्युफॅक्चरींग व ड) फॅब्रिकेशन ॲण्ड फिटींग ॲण्ड वेअरिंग.

क) बी.टी.आर.आय.साठीच्या आरक्षणातंर्गत महानिर्मिती कंपनीसाठी आवश्यक असलेले संबंधित व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) कोर्स उत्तीर्ण / राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांनी संबंधित व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र (NCTVT)/(MSCVT) धारण करणे आवश्यक आहे. सदर पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहित करण्यात आले आहेत. १) इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टीम २) बॉयलर अटेंडन्स ३) स्विच बोर्ड अटेंडन्स ४) स्टिम टर्बाईन ऑक्झीलरी प्लॅन्ट ऑपरेटर / स्टिम टर्बाइन ऑपरेटर ५) ऑपरेटर कम मेकॅनिक मटेरिअल हॅंडलींग इक्वीपमेंट इलेक्ट्रीशियन (वीजतंत्री) ६) ऑपरेटर कम मेकॅनिक (पॉवर प्लॅन्ट) ७) ऑपरेटर कम मेकॅनिक पोल्युशन कंट्रोल इक्वीपमेंट या शासनमान्य आय.टी.आय. / NCTVT /MSCVT उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.

ड) बी.टी.आर.आय.साठीच्या आरक्षणातंर्गत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदरील रिक्त पदे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन प्रथमत: ०५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांमधून भरण्यात येतील व तदोपरांतही पदे रिक्त राहिल्यास, सदरील पदे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन ०१ ते ०४ वर्षे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांमधून भरण्यात येतील.

इ) पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विद्युत केंद्राकरीता व सध्याच्या महानिर्मिती कंपनीमार्फत जमिन संपादित करण्यात आलेल्या महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांपैकी जे प्रकल्पग्रस्त उमेदवार खालील अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदविका ही शैक्षणिक अर्हता जाहिरातीच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक २५.११.२०२४ रोजी धारण करत असतील अशा उमेदवारांनी तंत्रज्ञ-३ पदाकरीता प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी या श्रेणीमधून अर्ज सादर करावेत. याकरीता इलेक्ट्रीकल / मेकॅनिकल /इन्स्ट्रुमेंटेशन / इलेक्ट्रॉनिक्स / कॉम्प्युटर / इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन/ पॉवर अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच सदरील तरतुदीनुसार अर्ज करताना, ऑनलाईन अर्जात **"Pragat Kushal Trainees who have completed 01 to 04 years of training"** या शिर्षकाखाली अर्ज सादर करावा. तथापि, सदर प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी त्यांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र व अभियांत्रिकी शाखेतील पदवी / पदविका या शैक्षणिक अर्हतेची नोंद ज्या प्रकल्पांकरीता जमिन संपादित करण्यात आलेली आहे, त्या प्रकल्पाशी संबंधित महानिर्मिती कंपनीच्या कार्यालयात जाहिरातीच्या अंतिम दिनांकापर्यंत नोंद करणे अत्यंत आवश्यक आहे व नोंद केल्याची खात्री करुन घेणे ही सर्वस्वी प्रकल्पग्रस्त उमेदवारांची जबाबदारी राहील. जे प्रकल्पग्रस्त उमेदवार वर उल्लेख केल्याप्रमाणे जाहिरातीच्या अंतिम दिनांकापर्यंत त्यांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची व शैक्षणिक अर्हतेची नोंद करणार नाहीत, त्यांचा अर्ज तंत्रज्ञ-३ या पदाकरीता अपात्र ठरविण्यात येईल.कृपया विशेष नोंद घ्यावी की, सदरील तरतूद ही केवळ महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी असून वरील नोंद केलेले अभियांत्रिकी पदवी / पदवीका उत्तीर्ण प्रकल्पग्रस्त यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संबंधित विद्युत केंद्रामार्फत त्यानुसार अहवाल प्राप्त झाल्यानंतरच वरील उमेदवारांचा विचार करण्यात येईल. (उमेदवारांनी आपला नोंदणी क्रमांकासोबत इतर कागदपत्रे संबंधित विद्युत केंद्रात सादर करावीत. तदनंतर संबंधित विद्युत केंद्र उमेदवारांची प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची वैधता तपासून अहवाल सादर केल्यानंतर त्यानुसार फक्त पात्र उमेदवारांची गणना पदवी / पदवीकाधारक प्रकल्पग्रस्त म्हणून करण्यात येईल.)

*** टिप :- महानिर्मिती कंपनीचे दिनांक ०१.१०.२०२४ रोजी पर्यंत १ वर्ष कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पुर्ण करीत असलेल्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता आय.टी.आय. मधील व्यवसायाची अट लागु राहणार नाही. सामान्य श्रेणी (महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तांव्यतिरिक्त इतर उमेदवार) करीता निर्धारीत केलेले आय.टी.आय. / NCTVT / MSCVT/COE मधील व्यवसाय (Trade) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.**

३) **वयोमर्यादा :** दिनांक ०१.१०.२०२४ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**टीप :** १) मागासवर्गीयांसाठी व आ.दु.घ.प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

२) दिव्यांग तसेच गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

४) प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रकल्प/१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ दि.०३/०२/२००७ नुसार खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी व भूकंपग्रस्तांसाठी कमाल वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

५) महानिर्मिती कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ही ५७ वर्षे राहील.

**सर्वसाधारण अटी :-**

१) उमेदवार हा भारतीय नागरीक व त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

२) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे, आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत /आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

३) जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना, अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने, कागदपत्रांच्या पूर्ण पडताळणीनंतर तसेच शैक्षणिक पात्रता पुर्ततेच्या अधीन राहून उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय निवड केली जाईल.

४) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना सामान्य (महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तांव्यतिरिक्त इतर उमेदवार) अथवा प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी (महानिर्मिती कंपनीचे किमान ०५ वर्षे किंवा अधिक कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले / महानिर्मिती कंपनीचे ०१ ते ०४ वर्षे कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले पात्र प्रकल्पग्रस्त/ महानिर्मिती कंपनी बी.टी.आर.आय. अंतर्गत आय.टी.आय.अभ्यासक्रम पूर्ण केलेले) या आरक्षणातून त्यांना लागू असलेला पर्यायच निवडावा व त्याबाबत खातरजमा करावी. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर ऑनलाईन परीक्षा / अंतिम निवड यादी प्रसिध्द करताना / केल्यानंतर उमेदवाराकडून वरील पर्याय निवडताना त्रुटी आढळून आल्यास, सदरील उमेदवाराच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

५) तसेच प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी कोटयातर्गत अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन अर्जात त्यांनी संबंधित विद्युत केंद्रातील प्रगत कुशल प्रशिक्षणार्थीसाठीच्या SAP प्रणालीतील SAP क्रमांक नमूद करणे बंधनकारक असेल. ऑनलाईन अर्जात SAP क्रमांक नमूद नसणे अथवा चुकीचा SAP क्रमांक सादर केला असल्यास सदरील उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही (महानिर्मितीतील पात्र अभियांत्रिकी पदवी / पदवीका धारक (स्थापत्य शाखेखेरीज) प्रकल्पग्रस्त यांनी SAP क्रमांक ९९९९९९९९ असा नमूद करावा). तसेच महानिर्मिती कंपनीबाहेरील उमेदवार, ज्यांनी प्रगत कुशल प्रशिक्षण कोटयातून जाणीवपूर्वक / चुकुन अर्ज केला असल्यास, त्यांचा विचार पुढील भरतीप्रक्रियेकरीता केला जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.त्यामुळे उमदेवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना योग्य ती खबरदारी घ्यावी.

६) मौजे शिंदाळा प्रकल्पातील पात्र प्रकल्पग्रस्तांनी (जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हतेतील अट क्र.(इ) नुसार पात्र अभियांत्रिकी पदवी / पदवीका धारक तसेच ०१ वर्ष प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रकल्पग्रस्तांना) ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन अर्जात SAP क्रमांका समोर SAP क्रमांक ८८८८८८८८ असा नमूद करावा. तसेच सदरील प्रकल्पग्रस्तांचा पात्रतेबाबतचा अहवाल संबंधित विद्युत केंद्रामार्फत प्राप्त करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७) महानिर्मिती कंपनीत कंत्राटदारामार्फत बाहयस्त्रोत कामगार म्हणून कार्यरत असलेल्या आणि विहित अर्हता पूर्ण करीता असलेल्या कंत्राटी कामगारांना त्यांच्या दि.०१.१०.२०२४ पर्यंत प्राप्त अनुभवाच्याआधारे प्रतिवर्ष ०२ गुण याप्रमाणे कमाल १० अतिरिक्त गुण देण्यात येतील. सदरील सवलत ही सामान्य आरक्षणातून (महानिर्मिती कंपनी बाहेरील म्हणजेच प्रगत कुशल नसलेले) अर्ज करणाऱ्या उमेदवारांना देण्यात येईल. यास्तव संबंधित उमेदवारांनी अर्ज सादर करताना योग्य ती खबरदारी घ्यावी.

वरील कोटयातून अर्ज सादर करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आपल्या ऑनलाईन अर्जात नमूद नोंदणी क्रमांक व त्यासोबत इतर कागदपत्रेही संबंधित विद्युत केंद्र / कार्यालय येथे दि.०१.१०.२०२४ रोजी पर्यंत सादर करणे बंधनकारक असेल. अशा उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे पडताळणीनंतरच / खातरजमा केल्यानंतरच त्यांना अतिरिक्त गुण देण्यात येतील.

८) शासकीय/निमशासकीय/तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / प्रमुख नियंत्रण अधिकारी यांच्यामार्फत विहित मुदतीत अर्ज सादर करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या/ संस्थेच्या सेवेची कोणतीही जबावदारी महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.**

९) महाराष्ट्र नागरी (छोटया कुटुंबाचे घोषणापत्र) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्येमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

**मागासवर्गाचे आरक्षणासंबंधी अटी / नियम:-**

१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे व तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ व तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क दि.२७.०२.२०२४ यांस अनुसरुन उपरोक्त शासन निर्णयान्वये आरक्षणासंबंधीच्या तरतुदी लागू होतील.

तसेच वरील अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (आ.दु.घ प्रवर्गातील प्रमाणपत्र) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (सा.व शै.मा.प्रवर्गाचे प्रमाणपत्र) उमेदवारांना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २५.११.२०२४ रोजी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पात्र उमेदवारांनी शासनाने पारीत केलेले व मा.सक्षम अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्यासाठी लागू असलेले मिळकतीचे प्रमाणपत्र सादर करावे. सदरील प्रमाणपत्र आणि इतर अटी / शर्तींच्या अनुषंगाने पात्रता संबंधित उमेदवारांची ठरविण्यात येईल.

२) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **जात वैधता प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे. सदरील जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोहोच सादर केल्यानंतरच **तात्पुरत्या** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

३) विजा-अ, भज-ब, भज-क व भज-ड या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतरपरिवर्तनीय आहे. सदरील तरतूद लागू करताना सामान्य आरक्षण (महानिर्मिती कंपनीचे प्रकल्पग्रस्त नसलेले) कोटयामधून अर्ज केलेल्या उमेदवारांचा सामान्य आरक्षणामधील रिक्त पदांसाठी विचार करण्यात येईल. तसेच प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल कोटयातर्गत वरील नमूद प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी कोटयातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

४) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.तथापि सदर उमेदवारांनी देखील मागासवर्गीय उमेदवारांनी सादर करावयाची सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल.

५) तंत्रज्ञ-३ या पदाकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व तंत्रज्ञ-३ या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे, जसे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र, कायमस्वरुपी दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, अनाथ प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र,खेळाडू प्रमाणपत्र, माजी सैनिक कार्यमुक्त प्रमाणपत्र, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, आय.टी.आय. / NCTVT / MSCVT/COE उत्तीर्ण प्रमाणपत्र, इत्यादी सर्व जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २५.११.२०२४ रोजी वैध असणे आवश्यक आहे. जे उमेदवार जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त व वैध प्रमाणपत्र धारण करणार नाहीत, त्यांचे अर्ज अवैध ठरविण्यात येतील. अशा उमेदवारांची उमेदवारी जाहिरातीच्या कोणत्याही टप्प्यात रद्द करण्यात येईल. तसेच भविष्यात नियुक्तीनंतर देखील सादर केलेली माहिती चुकीची / अवैध आढळून आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे / शासनाचे प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. (उमेदवारांनी नोंद घ्यावी की, आ.दु.घ.प्रवर्गाचे केंद्र शासनाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.)

७) मागासवर्गाच्या आरक्षणासाठी दावा करणाऱ्या सर्व उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत नमूद करणे आणि सदरील प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

८) सामाजिक व समांतर आरक्षणासंबंधात विविध न्यायालयांमध्ये दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियम:-**

१) शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५.०५.२००१ व शासन निर्णय क्र.महिआ २०२३/प्र.क्र.१२३ /कार्या-२, दि.०४.०५.२०२३ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील.

२) महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत आणि प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

३) दिव्यांग प्रवर्गासाठी जाहिरातीत नमूद दिव्यांग प्रकारात मोडत असणाऱ्या उमेदवारास एकुण ४ टक्के आरक्षण राहील. दिव्यांग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.अप्रक्रि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवितम नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (UDID Card) असणे अनिवार्य आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७.०६.२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. ज्या दिव्यांग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी दिव्यांग असल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २५.११.२०२४ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र उपलब्ध असेल, अशाच दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांग आरक्षणातंर्गत अर्ज सादर करावा. तसेच सदरील प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/ प्र.क्र.११४/१६-अ दि.२९.०५.२०१९ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/ प्र.क्र.२५१ दि.०२.०२.२०२१ मधील अटी व शर्ती लागू असतील.

४) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे. तसेच माजी सैनिक उमेदवारांनी यापूर्वी सदरील आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्यांना पुन:श्च सदरील आरक्षणाचा अनुज्ञेय नसेल, याची विशेष नोंद घ्यावी.

५) प्रकल्पग्रस्त कोटयातर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांना खालीलप्रमाणे तरतूदी लागू असतील :-

अ) शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७.१०.२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५% आरक्षण राहिल.

ब) प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी व प्रकल्पग्रस्त म्हणून अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे **महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एईएम-१०८०/३५/ १६-अ, दिनांक २१.०१.१९८० नुसार विहित नमून्यात प्रकल्पग्रस्तांचे त्यांच्या नावाचा प्राधान्यक्रम दाखला (प्रपत्र) असणे अत्यावश्यक आहे.**

६) गुणवत्ताधारक / प्राविण्य प्राप्त खेळाडूंसाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रोधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.३०.०४. २००५ अनुसार ५% आरक्षण राहील. खेळाडू आरक्षणातर्गत केवळ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेल्या अथवा सुवर्ण,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त केलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत.

७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.०१.०७.२०१६, शासन शुध्दिपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१८.०८.२०१६ तसेच शासन शुध्दिपत्रक राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि.११.०३.२०१९ व शासन शुध्दिपत्रक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.२४.१०.२०१९ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त / गुणवत्ताधारक खेळाडू व्यक्तिचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलती संबंधित कार्यवाही करण्यात येईल.

८) एका पेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवारांनी सदरील सर्व खेळांची माहिती ऑनलाईन अर्जात नमूद करावी. तसेच एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

९) प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

१०) खेळाचे प्राविण्य योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उप संचालक कार्यालयाकडून ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे तसेच कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान खेळाडू पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

११) कागदपत्रे जमा करतेवेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांची संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी / नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

१२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण क्र.१७१६/प्र.क्र.१८/क्रियुसे-२ दि.३०.०६.२०२२ अन्वये खेळाडू उमेदवारांनी खेळ प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची मा.आयुक्त, क्रिडा व युवक सेवा संचालनालय,शिव छत्रपती क्रिडा संकुल, म्हाळुंगे,बालेवाडी,पुणे-४५ येथून खेळ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. तदनंतरच उमेदवाराची खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

१३) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३.०८.२०१४ तसेच शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक.संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि.१९.१२.२०१८ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ दि.२५.०१.२०२४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१४) शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दि. २७/०८/२००९ मधील तरतुदीनुसार भूकंपग्रस्त व्यक्तींसाठी २ टक्के समांतर आरक्षण राहील.

१५) महानिर्मिती कंपनीमध्ये दिनांक ०१.१०.२०२४ रोजी पर्यंत एक वर्षाचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे, अशा उमेदवारांना तंत्रज्ञ-३ पद भरतीत भरावयाच्या एकूण पदाच्या संख्येच्या ५०% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. अशा उमेदवारांची स्वतंत्र गुणवत्ता यादी बनविण्यात येईल. मात्र, इतर उमेदवारांप्रमाणेच निवडीकरीता लागू असलेले सर्व निकष त्यांनाही लागू असतील याची नोंद घ्यावी.

१६) पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये औष्णिक विद्युत / जल विद्युत / वायु विद्युत केंद्रात अथवा महानिर्मिती कंपनीमध्ये यशस्वीरित्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व (NCTVT) उत्तीर्ण झालेले आहेत, अशा प्रशिक्षणार्थीकरिता १०% पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. महावितरण व महापारेषण या कंपनीतून शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या वरील आरक्षणातर्गत विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१७) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का.०३ दि.२३.०८.२०२१ व शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मधील नमूद तरतुदींच्या अधीन राहून अनाथ उमेदवारांना दिव्यांग व्यक्तीकरीता लागू असलेल्या आरक्षणाच्या तरतूदीनुसार १% पदे समांतर आरक्षणातर्गत राखीव ठेवण्यात येतील.

- **टिप :- प्रगत कुशल प्रशिक्षण (PAP Training), बी.टी.आर.आय. व शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण (Apprentice) या वेगवेगळया संकल्पना असून उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना याची नोंद घेऊन काळजीपूर्वक अर्ज भरावा.**

**महत्वाच्या सूचना :**

१) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा ई-मेल आय-डी व मोबाईल नंबर काळजीपूर्वक भरावा.उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल नंबर भरती-प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे, ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा ईमेल-आयडी व मोबाईल नंबर बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास महानिर्मिती कंपनी जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) एका उमेदवाराने एकच ऑनलाईन अर्ज सादर करणे अपेक्षित आहे. तथापि उमेदवाराने एकापेक्षा अधिक ऑनलाईन अर्ज सादर केल्यास / भरल्यास, तर सदरील उमेदवाराचा नवीनतम (Latest) अर्ज भरती प्रक्रियेवेळी विचारात घेण्यात येईल.

३) जाहिरात प्रक्रियेसंबंधीची अधिक माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर वेळोवेळी उपलब्ध होईल.

४) **अ) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने, अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिध्द करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे ही, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असल्याबाबतची सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही, त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी स्वत: उमेदवाराची राहील.**

**ब) उमेदवाराने अर्जात अचुक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा.जात, प्रकल्पग्रस्त,खेळाडू,भुकंपग्रस्त,महिला आरक्षण, शिकाऊ उमेदवारी, प्रगत कुशल प्रशिक्षण, माजी सैनिक, दिव्यांग इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबंधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५) उमेदवाराने ऑनलाईन अर्जात दावा केलेला सामाजिक व समांतर आरक्षणासमोर त्यांची निवड झाल्यास, ती सिध्द करणे संपूर्णत: उमेदवाराची जबाबदारी असून ती सिध्द न झाल्यास उमेदवाराचा विचार सामान्य अथवा खुल्या प्रवर्गातून करण्यात येणार नाही.

६) तंत्रज्ञ-३ या पदाकरीता उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा मराठी व इंग्रजी या भाषेत घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

८) ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे, याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागितली जातील त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

९) ऑनलाईन पध्दतीने तंत्रज्ञ-३ या पदाकरीता अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी तंत्रज्ञ-३ या पदाची पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ऑनलाईन अर्जाची प्रत हरविल्यास, गहाळ झाल्यास त्यास महानिर्मिती कंपनी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१०) ऑनलाईन अर्जात नमूद केलेले संभाव्य परीक्षा केंद्रात यांच्यामध्ये बदल होणे अपेक्षीत आहे व त्यानुसार उमेदवारांच्या परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवीत आहे. त्याबाबत उमेदवारांकडून विशिष्ट परीक्षा केंद्रात परीक्षा देण्याच्या विनंतीबाबत महानिर्मिती कंपनीकडून विचार करण्यात येणार नाही. तसेच संबंधित परीक्षा केंद्रात पोहचणे ही उमेदवारांची जबाबदारी असेल, त्याबाबत कोणताही आर्थिक खर्च महानिर्मिती कंपनीमार्फत अदा करण्यात येणार नाही.

**उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना :**

१) शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच महानिर्मिती कंपनीच्या सेवेतील कर्मचाऱ्याने वर नमूद केलेल्या पदांकरिता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचाऱ्याला सक्षम अधिकाऱ्यामार्फत निर्गमित / वितरीत केलेले खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे जमा करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) सदरील जाहिरातीमध्ये नमूद केलेले शासन निर्णय / परिपत्रके आणि महानिर्मिती परिपत्रके व्यतिरिक्त इतर नमूद नसलेल्या बाबींसाठी महानिर्मिती कंपनीचे प्रशासकिय परिपत्रके व प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील भरती प्रक्रियेविषयक सर्व बाबींबाबत निर्णय घेणे तसेच अटी व शर्ती बदलण्याबाबतचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवीत आहे.

३) तंत्रज्ञ-३ पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व ऑनलाईन परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) माजी सैनिक (Ex-Serviceman) उमेदवारांनी त्यांचे व्यवसाय (Trade) प्रमाणपत्र हे जाहिरातीत "शैक्षणिक अर्हतेमध्ये" दर्शविण्यात आलेल्या कोणत्याही एका व्यवसायाशी (Trade) समतुल्य / समकक्ष असल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा सैनिक बोर्डाकडुन घेवून अंतिम निवड प्रक्रियेवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. तसेच संबंधित माजी सैनिकांनी जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष असलेले व्यवसाय प्रमाणपत्र सादर केले नसल्यास, सदरील प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकाऱ्याकडून त्याने केलेला व्यवसाय हा जाहिरातीत नमूद आवश्यक शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष असलेले प्रमाणपत्र कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरील प्रमाणपत्राची वैधता ही संबंधित माजी सैनिक कल्याण विभागाकडून करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करित असल्याबाबत खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.** तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे तसेच ऑनलाईन परिक्षेकरीता तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास, कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

६) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल व तसेच उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेली माहिती, परीक्षा केंद्रात सिध्द करु न शकल्यास त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७) वरील पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उमेदवारांनी निवड केलेल्या जवळच्या परीक्षा केंद्रात त्यांना परीक्षा देण्याबाबतचे सर्वोत्तपरी प्रयत्न महानिर्मिती कंपनीमार्फत करण्यात येतील, तथापि प्रशासकिय / अपरिहार्य कारणास्तव अथवा इतर कारणास्तव उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा इतर जिल्हयातील परीक्षा केंद्रात घेण्यात येऊ शकते.

८) ऑनलाईन परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे. अशी संपर्काची साधने वापरताना आढळून आल्यास संबंधित उमेदवारास अपात्र करुन त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून (दिव्यांग व अनाथ आरक्षण वगळून) ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे त्याच जातीप्रवर्गातील इतर उमेदवारांमधून गुणानुक्रमे भरण्यात येतील.

१०) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

११) **उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वत:च्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २६.१२.२०२४ रोजी वैध असलेले उपलब्ध असणे आवश्यक आहे.**

१२) **अ)** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग, एसईबीसी आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या मागासप्रवर्गातील उमेदवारांनी सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (आ.दु.घटकासाठी मिळकतीचे प्रमाणपत्र) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २६.१२.२०२४ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्रे जमा करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**ब)** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग,एसईबीसी आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २६.१२.२०२४ रोजी वैध असलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्रे जमा करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**क)** महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे जमा करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३) मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांनी कामावर रुजू होताना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, रुजू होण्यापूर्वी सर्व कागदपत्रे प्रस्तावासह जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करुन ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा शासन निर्णयानुसार सदर उमेदवारांची महानिर्मिती कंपनीतील सेवा समाप्त करण्यात येईल.

१४) ऑनलाईन परिक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना कंपनीने मागणी केल्यानंतर, कागदपत्रे जमा करतेवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधी, अधिवास, विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती व तंत्रज्ञ-३ या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या स्व-साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्या सापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदे व आवश्यकतेनुसार महानिर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्रात नेमणूका देण्यात येतील.

१६) सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१७) तंत्रज्ञ-३ या पदाकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व तंत्रज्ञ-३ या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दिनांक २५.११.२०२४ रोजी वैध असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्विकृत (Submit) करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर उमेदवाराची कोणतीही दुरुस्ती विचारात घेतली जाणार नाही. सदर बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१८) महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार सरळसेवा प्रवेशाद्वारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुण व खुल्या प्रवर्गातून अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण मिळविणे आवश्यक आहे. हा निकष विचारात घेऊन पद भरती प्रक्रिया पार पाडण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच महानिर्मितीतील प्रकल्पग्रस्तांकरीता राखीव कोटयातील पदांकरीता उमेदवारांना एकूण गुणांपैकी २०% गुण मिळणे आवश्यक आहे.

१९) वरील पदांकरीता ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांनुसार उमेदवारांची सेवाजेष्ठता ठरविण्यात येईल.

२०) वरील पदाकरीता प्रसारित करण्यात येणारी अंतिम निवड यादी / प्रतिक्षा यादी ही निवड यादी प्रसारित करण्याच्या दिनांकापासून ०१ वर्षाकरीता वैध असेल व तदनंतर सदरील निवड / प्रतिक्षा यादीची वैधता संपुष्टात येईल.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http://www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) उमेदवार परिक्षा शुल्क भरण्यासाठी Net Banking / क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड या सुविधा वापरुन परिक्षा शुल्क भरु शकतील. उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परिक्षा शुल्क उपरोक्त पध्दतीद्वारे भरावयाचे आहे. **दिव्यांग आणि माजी सैनिक उमेदवारांकरीता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे**.

| | | |
|---|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | : | रु. ५००/- (+GST) |
| मागासवर्गीय उमेदवार | : | रु. ३००/- (+GST) |

३) विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज कंपनीच्या संकेतस्थळावर दिनांक २६.११.२०२४ पासून उपलब्ध राहील. सदर अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २६.१२.२०२४ रोजी २३:५९ वाजेपर्यंतच राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

४) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील व ती सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अर्ज सादर केल्यानंतर त्यामधील बदलाबाबतची दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला, भुकंपग्रस्त दाखला, माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण प्रमाणपत्र, प्रगत कुशल प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

६) ऑनलाईन अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल व त्यांची उमेदवारी रद्द समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात नमूद कार्यरत कार्यालयातून, नियुक्ती प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेल्या 'ना हरकत प्रमाणपत्राची' प्रत कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेवेळी सादर करणे आवश्यक असेल.

८) वरील पदाकरीता ऑनलाईन अर्ज सादर करताना उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्याच्या मुख्य पृष्ठावर विहित केलेल्या छायाचित्र अपलोड करावयाच्या मानांकनानुसार (JPG File ची Size, उंची व रुंदी व इतर मानांकन) सादर करावीत. तसेच ऑनलाईन अर्ज सादर झाल्यानंतर (देयके अदा केल्यानंतर) ऑनलाईन अर्जाची प्रत डाऊनलोड करुन सदरील अर्जात उमेदवारांचे छायाचित्र व सहीचे छायाचित्र योग्य असल्याबाबतची शहानिशा उमेदवाराने करावी. प्रत्यक्ष ऑनलाईन परीक्षेदरम्यान संबंधित परीक्षा केंद्रात उमेदवारांची पडताळणी करताना त्यांनी सादर केलेले छायाचित्र लहान असणे / अस्पष्ट असल्यास, अशा प्रकरणी उमेदवाराला परीक्षा केंद्रात बसता येणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

९) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या नावानुसार ऑनलाईन परीक्षा केंद्रात त्याबाबतचे शासन मान्य ओळखपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ऑनलाईन अर्जात व प्रत्यक्ष परीक्षा केंद्रात सादर केलेले प्रमाणपत्र (फक्त Hardcopy-मोबाईलवरील Soft Copy ग्राहय धरण्यात येणार नाही) यांच्यात एका अक्षर / शब्दाचाही फरक/तफावत आढळल्यास त्याप्रकरणी उमेदवारांना परीक्षा केंद्रात ऑनलाईन परीक्षा देण्यात यावे किंवा कसे याबाबतचे संपूर्ण अधिकार संबंधित बाहयस्त्रोत भरती संस्थेकडे राहतील याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच सदरील प्रकरणी फरक / तफावत असलेल्या उमेदवारांच्या प्रकरणी महानिर्मिती कंपनीकडून कोणताही हस्तक्षेप होणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**निवड पध्दती :**

१) जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची चाळणी करण्यासाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

२) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५०२ दि.१०.०८.२०२२ नुसार सरळसेवेअंतर्गत महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रगत कुशल उमेदवारांसाठी अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुणांचा निकष विचारात घेऊन पद भरती प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच इतर सर्वसाधारण उमेदवारांकरीता (महानिर्मिती पात्र प्रकल्पग्रस्तांखेरीज इतर उमेदवार-सामान्य श्रेणीतील उमेदवार) खुल्या प्रवर्गासाठी किमान ३०% गुणांचा व मागास प्रवर्गासाठी २०% गुणांचा निकष विचारात घेऊन भरती प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच वरील परिपत्रकानुसार सदरील पदाची निवड यादी ही ऑनलाईन परीक्षेअंती प्राप्त गुणांच्या अनुषंगाने तयार करण्यात येईल. तसेच वरील किमान गुणांची आवश्यकता पूर्ण केल्यानंतर सदरील उमेदवारांची गुणानुक्रमे सामाजिक व समांतर आरक्षणाची निवड यादी तयार करण्यात येईल.

३) **उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार** तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड सूची / यादी तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची कंपनीच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी श्रेणीतून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना (अभियांत्रिकी पदवी / पदविका प्रकल्पग्रस्त उमेदवार जे प्रगत कुशल प्रशिक्षणावर रुजु झालेले नाहीत असे उमेदवार वगळून) ऑनलाईन परीक्षेच्या ७५ गुणांव्यतिरिक्त अधिकतम २५ गुण हे त्यांच्या दिनांक ०१.१०.२०२४ रोजी पर्यंत महानिर्मिती कंपनीत प्रशिक्षण कालावधी पूर्ण केलेल्या प्रत्येक पूर्ण वर्षाकरीता देण्यात येतील म्हणजेच दिनांक ०१.१०.२०२४ रोजी पर्यंत महानिर्मिती कंपनीत ०१ वर्ष कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले असल्यास ऑनलाईन परीक्षेत मिळालेले गुण अधिक ०५ गुण, ०२ वर्ष कालावधीचे प्रगत कुशल प्रशिक्षण पूर्ण केलेले असल्यास अधिक १० गुण अशा पध्दतीने देण्यात येतील. सदरील अधिकच्या गुणांची मर्यादा ही कमाल २५ गुणांची राहील. तसेच प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांची गुणवत्ता यादी ही ऑनलाईन परीक्षेचे ७५ गुण अधिक प्रगत कुशल प्रशिक्षण कालावधीकरीताचे २५ गुण अशी १०० गुणांच्या अधिन राहून उमेदवारांना प्राप्त एकूण गुणांनुसार तयार करण्यात येईल.

**टिप**:- महानिर्मिती पत्र क्र.महानिर्मिती/मु.व्य.(से.प्र.मासं)/२२९८ दि.२८.०२.२०१९ अन्वये परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे समाविष्ट करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून अर्ज सादर करता येईल.

५) महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्रमांक ३८८ दिनांक १८.०८.२०१७ अन्वये सामाजिक उत्तरदायित्व योजनेअंतर्गत कोराडी ३x६६० मे.वॅ.प्रकल्पाकरीता बाधीत गावातील उमेदवारांना दिनांक ०१.१०.२०२४ रोजी पर्यंत प्रत्येक पूर्ण वर्षासाठी एकूण ०५ गुण देण्यात येतील व तसेच कमाल गुणांची मर्यादा २५ राहील. तसेच वरील तरतूदीनुसार महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.५२८ दि.२२.०८.२०२३ नुसार भुसावळ येथे सामाजिक उत्तरदायित्व योजना नुकतीच प्रसिध्द झाली असल्याने, सदरील प्रशिक्षणातर्गत उमेदवारांचे ०१ वर्ष प्रशिक्षण पूर्ण न झाल्याने त्याबाबतची तरतुद ऑनलाईन अर्जामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**टिप**:- उमेदवारांनी परीक्षेचा ऑनलाईन अर्ज भरताना सदरील अर्जात सामाजिक उत्तरदायित्व योजनेअंतर्गत कोराडी ३x६६० मे.वॅ.प्रकल्पाकरीता बाधीत गावातील उमेदवार असणे बंधनकारक राहील. जर अनावधनाने उमेदवाराने वरील माहिती नमूद करणे राहीले असेल तर महानिर्मिती सदरील चुकीला जबाबदार नसेल व पुढील भरती प्रक्रियेत कोणतेही बदल करता येणार नाहीत / विचारात घेण्यात येणार नाही.

६) महानिर्मिती कंपनीतील बाहयस्त्रोत कार्यरत / काम केलेल्या तसेच विहित अर्हता पूर्ण केलेल्या तांत्रिक कंत्राटी कामगारांना त्यांच्या दि.०१.१०.२०२४ रोजी पर्यंत प्राप्त अनुभवाच्या आधारे प्रतिवर्ष ०२ गुण याप्रमाणे कमाल १० अतिरिक्त गुण देण्यात येतील. सदरील सवलत ही सामान्य आरक्षणातून (महानिर्मिती कंपनी बाहेरील म्हणजेच प्रगत कुशल नसलेले) अर्ज करणाऱ्या उमेदवारांना देण्यात येईल.

७) उमेदवारांची निवड जेष्ठता ही त्यांना ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांस अनुसरुन तसेच जाहिरातीत नमूद सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अधीन राहून निश्चित करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) कंपनीने मागणी केल्याप्रमाणे उमेदवारांनी अर्जाची प्रत व त्यात नमूद कागदपत्रांच्या प्रती पडताळणीकरीता सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्ठयर्थ योग्य ते दस्तऐवज जमा करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील, अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

९) उमेदवाराने एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास आणि त्यामधील जातीचा प्रवर्ग व अर्जाची फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंदी रद्दबातल समजल्या जातील.

१०) निवडसुची बनवितांना उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर त्यामधील महानिर्मिती कंपनीच्या प्रकल्पग्रस्त उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तद्नंतरही दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन म्हणजेच वयोमानातील जेष्ठतेनुसार त्यांच्यातील ज्येष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

११) तसेच निवड यादीनंतर उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी दरम्यान सादर केलेले कागदपत्रे ही कागदपत्रे जमा केल्याच्या तीन महिन्यांकरीता जतन करण्यात येतील, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१२) **निवड झालेल्या उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारिरीक बाधित / व्यंगत्वाचे प्रमाण, माजी सैनिक, प्रगत कुशल प्रशिक्षण, भूकंपग्रस्त, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण, अनाथ प्रमाणपत्र इत्यादी सिध्द करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.**

१३) दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**महत्वाच्या तारखा :**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक २६.११.२०२४ ते दिनांक २६.१२.२०२४ |
| Net Banking /डेबिट कार्ड /क्रेडिट कार्ड द्वारे फी भरण्याचा कालावधी | दिनांक २६.११.२०२४ ते दिनांक २६.१२.२०२४ |
| ऑनलाईन परिक्षेची तारीख | महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. |

**ऑनलाईन अर्ज करण्याकरीता येथे Click करावे.**